# वसई-विरार शहर महानगरपालिका
## निवडणूक विभाग

दि.१६/०७/२०२२

## <u>जाहीर सूचना</u>

मा.राज्य निवडणूक आयोग यांचेकडील पत्र क्र.रानिआ/मनपा २०२२/ प्र.क्र.२९/ का-५, दि.०६/०७/२०२२ च्या सुधारित आदेशान्वये वसई विरार शहर महानगरपालिका सार्वत्रिक निवडणूक-२०२२ करीता अंतिम मतदार यादी शनिवार, दि.१६/०७/२०२२ रोजी प्रसिद्ध करण्याचे निर्देश दिले होते.

त्याअनुषंगाने आज दि.१६/०७/२०२२ रोजीपासून प्रभाग निहाय अंतिम मतदार याद्या सर्व प्रभाग समिती कार्यालये- १. प्रभाग समिती 'ए', बोळींज, २. प्रभाग समिती 'बी', विरार पूर्व, ३.प्रभाग समिती 'सी', चंदनसार, ४.प्रभाग समिती 'डी', आचोळे, नालासोपारा पूर्व ५.प्रभाग समिती 'ई', नालासोपारा पश्चिम, ६.प्रभाग समिती 'एफ', धानीव-पेल्हार, ७.प्रभाग समिती 'जी', वालीव, ८.प्रभाग समिती 'एच', नवघर-माणिकपूर, ९.प्रभाग समिती 'आय' वसई गाव १०.निवडणूक कार्यालय, वसई विरार शहर महानगरपालिका मुख्यालय, विरार (पूर्व) येथे प्रसिद्ध करण्यात येत असून सदरच्या अंतिम मतदार याद्या या वरील ठिकाणी नागरिकांच्या माहितीसाठी व शासकीय दराने विक्रीसाठी उपलब्ध असतील.

त्याचप्रमाणे सदरील अंतिम मतदार याद्या ह्या www.vvcmc.in या महानगरपालिकेच्या अधिकृत संकेतस्थळावर देखील प्रसिद्ध करण्यात आलेल्या आहेत. सदरील मतदार याद्या ह्या (१) मा.जिल्हाधिकारी कार्यालय - पालघर, (२) उप-विभागीय अधिकारी कार्यालय- वसई, (३) तहसील कार्यालय – वसई. येथे देखील नागरिकांच्या माहितीसाठी प्रसिद्ध करण्यात आलेल्या आहेत.

**निवडणूक विभाग**
**वसई विरार शहर महानगरपालिका**